महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य ॲकॅडमीची
स्थापना

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:ओएफएल-१०८२/सीआर-९/८२/अल्पसंख्यांक कक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: २४ जानेवारी १९८३

निर्णय:-

राज्यात सिंधी साहित्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व उत्तेजनासाठी राज्य सिंधी साहित्य ॲकॅडमीची स्थापना करण्यात येत आहे. ॲकॅडमीच्या मंडळाची रचना खालीलप्रमाणे असेल :-

१. श्री. मोति के. दर्यानानी - अध्यक्ष.
२. प्रो. राम पंजवानी - सदस्य.
३. श्री. बलदेव टी. गजरा - सदस्य.
४. कु. सिता सप्तानी - सदस्य.
५. श्री. लच्छमन खुबचंदानी - सदस्य.

२. ॲकॅडमीच्या मंडळाचा पदावधि ३ वर्षांचा असावा. अध्यक्षांनी आपला कार्यभार ग्रहण केल्यानंतर ॲकॅडमीचे कामकाज सुरु होईल. ॲकॅडमीची कार्ये पुढीलप्रमाणे असावीत :-

१. ह्या राज्यात सिंधी भाषेला सर्व बाजूंनी प्रोत्साहन देणे.
२. भाषांतराने वा अन्य साहित्यिक प्रयत्नांनी राज्यभाषा मराठी व सिंधी यामध्ये सृजनात्मक कल्पनांची देवाण-घेवाण करणे.
३. ज्यामुळे सिंधीची उन्नती होऊ शकेल अशा योजनांस प्रारंभ करणे, मदत करणे किंवा कार्यान्वित करणे.
४. सिंधी भाषेत संशोधन निबंध [पेपर्स], प्रबंधिका, पुस्तके आणि जर्नल्स प्रसिध्द करण्यास प्रारंभ करणे, मदत करणे किंवा हाती घेणे.
५. महाराष्ट्रात स्थायिक असलेल्या सिंधी लेखक व कवींच्या, वाङ्मयीन कलाकृती प्रसिध्द करण्यास मंडळास मान्य असेल तर आर्थिक मदत करणे.
६. सिंधी साहित्यिक संस्थांना व सिंधी वाङ्मयीन कार्यक्रमांना आर्थिक मदत देणे.
७. राज्यात सिंधी भाषेला उत्तेजन देण्यासाठी चर्चासत्रे, संमेलने, परिसंवाद, प्रदर्शने यांस प्रारंभ करणे, मदत करणे किंवा आयोजित करणे.

2 MAR 1983 ISSUED 2/3/83

..२

Scanned by CamScanner

८. ग्रंथालये व सार्वजनिक वाचनालये यांना सिंधी पुस्तके व मासिके यांचा पुरवठा करणे.

९. सिंधी भाषेतील वेगवेगळया वाङ्मयीन क्षेत्रातील श्रेष्ठत्वासाठी राज्यातील लेखक व कवींना पुरस्कार देणे.

१०. या राज्यात स्थायिक असलेल्या लायक सिंधी विद्वानांना वा हुशार विद्यार्थ्यांना अभिछात्रवृत्ती आणि/किंवा शिष्यवृत्ती देणे.

११. राज्य शासनाने मान्यता दिलेल्या साधनांद्वारे जनतेकडून वर्गणी गोळा करणे आणि/किंवा निधी, देणग्या उभ्या करणे व त्यांचा वापर ॲकॅडमीच्या कार्यक्रमांसाठी करणे.

१२. राज्य शासनाला वेळोवेळी मंडळाच्या कार्यक्रमांची माहिती देणे.

१३. राज्यातील सिंधीच्या विकासासाठी धोरण तयार करताना शासनाला सल्ला देणे व त्यांचे कार्यान्वयन करताना मदत करणे.

३. ॲकॅडमीच्या बैठकींना उपस्थित रहाण्यासाठी सदस्यांना [अशासकीय सदस्य वगळून] ते ज्या शासन, विद्यापीठ किंवा इतर शासकीय संस्थेत काम करीत असतील तेथे त्यांना लागू असलेल्या नियमांप्रमाणे प्रवासभत्ता व दैनिकभत्ता मिळेल. ॲकॅडमीच्या अशासकीय सदस्यांना श्रेणी एक, नियम १[१][ब] उपविभाग एक, परिशिष्ट ४२-अ, मुंबई नागरी सेवा, नियम १९५९, खंड दोन व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: टीआरए-१४७७/१०३२-सी/एसईआर-५, दिनांक २३-९-१९७७ अन्वये प्रवासभत्ता व दैनिकभत्ता मिळेल. मंडळाच्या सदस्यांच्या प्रवासभत्त्याच्या बिलावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार अवर सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांना दिले आहेत.

४. ॲकॅडमीच्या मंडळावर होणारा खर्च कशाप्रकारे समायोजित करावा [ booking the expenditure ] याचे आदेश वेगळे निर्गमित करण्यात येतील.

५. हा निर्णय अनौपचारिक संदर्भ क्र. २५३/इएक्सपी-४, दिनांक २१ जानेवारी १९८३ अन्वये वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

द. मं. तोरगल,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,



Scanned by CamScanner

सर्व मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,

महालेखापाल-महाराष्ट्र-२, नागपूर,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

वित्त विभाग [इएक्सपी-४],

* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

मंत्रालयातील सर्व विभाग/सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई

[प्रसिध्दीपत्रक निर्गमित करण्याच्या विनंतीसह]

महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अॅकॅडमीच्या मंडळाचे सर्व सदस्य

* निवड फाईल [२ प्रती]

* पत्राने.

दिवेकर
३५२८३.